दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सायबर सुरक्षेसाठी नवी दिल्लीत राष्ट्रीय परिषद

नवी दिल्ली: वाढत्या सायबर गुन्हेगारीला आळा घालणे, डिजिटल तपास यंत्रणा सक्षम करणे आणि देशाचे डिजिटल भविष्य अधिक सुरक्षित बनवण्याच्या उद्देशाने नवी दिल्लीत तिसऱ्या राष्ट्रीय सायबर सुरक्षा, डिजिटल न्यायवैद्यक आणि थ्रेट इंटेलिजन्स परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान संस्था यांच्या वतीने 16 आणि 17 नोव्हेंबर 2026 रोजी ही परिषद होणार आहे.

राजस्थानमध्ये रेल्वे उडवण्याच्या कटातील दोघांना पंजाबमधून अटक

चंदीगड: राजस्थानच्या श्रीगंगानगर जिल्ह्यात रेल्वे रुळावर झालेल्या स्फोट प्रकरणात पंजाबमधून दोघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी सुरक्षा यंत्रणांनी मोठा खुलासा केला आहे. या दहशतवादी कटामागे पाकिस्तानच्या आयएसआयचा हात असल्याचे तपासात सांगण्यात आले आहे. राजस्थान दहशतवादविरोधी पथक म्हणजेच एटीएस, श्रीगंगानगर पोलीस आणि पंजाब पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत एका पुरुष आणि एका महिलेला या प्रकरणी अटक करण्यात आली. दोघानांही पंजाबमधील गुरदासपूरमधून अटक केली आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


थोडक्यात वार्ता

रेकी केल्याप्रकरणी तरुणाला अटक

मुंबई : मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यात लक्ष्य करण्यात आलेल्या कुलाबा येथील नरिमन हाऊससह शहरातील काही संवेदनशील ठिकाणांची टेहळणी केल्याच्या आरोपावरून २० वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. यश सिंग असे या तरुणाचे नाव असून, तो नवी मुंबईतील ऐरोली परिसरात राहणारा आहे. शनिवारी नवी मुंबईत ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, सिंग परदेशातील सूत्रधारांच्या संपर्कात होता. त्याला मुंबईतील ज्यू नागरिक, परदेशी नागरिक आणि त्यांच्या व्यवसायांची माहिती गोळा करण्याचे काम देण्यात आले होते. यासाठी तो संबंधित व्यक्तींची छायाचित्रे, वाहनांचे तपशील आणि ठिकाणांची अचूक माहिती गोळा करून ती आपल्या संपर्कातील व्यक्तींना पाठवत असल्याचा आरोप आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्कशी त्याचे संबंध असल्याची माहिती मिळाल्यानंतर नवी मुंबई दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) तपास सुरू केला. या तपासादरम्यान सिंगच्या कारवायांचा संबंध केरळमधील त्रिशूर येथे बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्यांतर्गत (यूएपीए) दाखल असलेल्या एका प्रकरणाशी असल्याचे समोर आले. त्यानंतर केरळ पोलिसांनाही या तपासात सहभागी करून घेण्यात आले.

ब्रिटनचे प्रिन्स आणि त्यांची पत्नी यांच्या भारत वाहतुकीमध्ये बदल



मुंबई: ब्रिटनचे प्रिन्स विलियम आणि त्यांची पत्नी प्रिंसेस केट मिडलटन हे पुढच्या तीन दिवसांसाठी भारत दौऱ्यांवर येणार आहे. त्यांच्या मुंबई दौऱ्यामुळे मुंबईतील वाहतुकीच्या नियमांमध्ये बदल करण्यात येणार आहे. मुंबईतील अनेक प्रमुख रस्ते यावेळी बंद ठेवण्यात येणार असून मुंबईकरांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. वाहतूक पोलिसांनी रविवारी दक्षिण मुंबईच्या काही भागांमध्ये 16 नोव्हेंबर ते 19 नोव्हेंबर दरम्यान वाहतुकीमध्ये बदल, वाहतुकीसाठी रस्ते बंद आणि काही रस्त्यांवर पार्किंगचे निर्बंध लागू करण्यात आल्याची माहिती मुंबई वाहतूक पोलिसांनी आज दिली आहे.

16 नोव्हेंबर ते 19 नोव्हेंबर दरम्यान ब्रिटनचे प्रिन्स विलियम आणि त्यांची पत्नी प्रिंसेस केट मिडलटन मुंबईमध्ये भारत दौऱ्यासाठी येणार आहेत. ब्रिटनचे प्रिन्स विलियम आणि त्यांची पत्नी प्रिंसेस केट मिडलटन यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईमध्ये वाहतुकीसंबंधित निर्बंध लादण्यात आले आहेत. यावेळी ते मुंबईमध्ये ते अर्थशॉट प्राईज समिट आणि अवॉर्ड्स नाईटमध्ये सहभागी होणार आहेत. मोटार वाहन कायद्यांतर्गत पोलीस उपआयुक्त (दक्षिण मुंबई वाहतूक) हेमराजसिंग राजपूत यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, वाहतूक कोंडी रोखणे आणि वाहनांचा सुरळीत प्रवाह सुनिश्चित करणे हा या निर्बंधांचा उद्देश आहे, मात्र रुग्णवाहिका, अग्निशमन दलाच्या गाड्या, पोलीस आणि इतर आपत्कालीन वाहनांना यातून सूट देण्यात आली आहे.

लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ 4 दिवसांच्या दौऱ्यावर



नवी दिल्ली : भारत आणि चेक प्रजासत्ताक यांच्यातील द्विपक्षीय संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने भारतीय लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ 16 ते 19 नोव्हेंबर 2026 या कालावधीत चेक प्रजासत्ताकाच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दौऱ्यात दोन्ही देशांमधील लष्करी संबंध दृढ करणे, संरक्षण तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि संरक्षण उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या नव्या संधी शोधण्यावर भर दिला जाणार आहे. या दौऱ्यादरम्यान जनरल धीरज सेठ प्राग येथील जनरल स्टाफ मुख्यालयात चेक सशस्त्र दलांचे वरिष्ठ लष्करी अधिकारी, जनरल स्टाफ प्रमुख लेफ्टनंट जनरल पेट्र चेपेलका आणि संरक्षण उपप्रमुख यांची भेट घेणार आहेत. यावेळी दोन्ही देशांमधील लष्करी सहकार्य, प्रशिक्षण, सैन्याचे आधुनिकीकरण आणि उदयोन्मुख सुरक्षा आव्हाने यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. याशिवाय, जनरल धीरज सेठ चेक लष्कराच्या शहीद जवानांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहणार आहेत. तसेच चेक प्रजासत्ताकच्या संरक्षण मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही ते भेट घेणार आहेत.

'देशाला बदनाम करून सत्ता मिळणार नाही!' अमित शाहांचा राहुल गांधींवर निशाणा!

पुणे: केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हैदराबादमध्ये झालेल्या काँग्रेसच्या भारत शिखर परिषदेवरून राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. सध्या केंद्रीय मंत्री अमित शाह दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आहे. यावेळी पुणेकरांना संबोधतांना शाह म्हणाले की, राहुल गांधींनी देशाची बदनामी केली आहे. जर राहुल यांना जिंकायचे असेल, तर त्यांनी परदेशात न जाता खेड्यापाड्यामध्ये जाऊन नागरिकांना भेट द्यायला हवी. यावेळी अमित शाह यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांनाही एक संदेश दिला. अमित शाह म्हणाले की, काँग्रेस पक्ष गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राजकीय पराभवाचा सामना करत आहे. या नैराश्यातूनच काँग्रेस वेगवेगळ्या प्रकारे आपली नाराजी व्यक्त करत असल्याची टीका अमित शाह यांनी केली.

फरिदाबाद येथे आयोजित कार्यक्रमात देशभरातून लोकांना बोलावण्यात आले होते. राहुल गांधीही या कार्यक्रमाला उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये राहुल गांधी यांनी भारतविरोधी वक्तव्ये करून देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अमित शाह यांनी केला. अमित शाह म्हणाले, "आज मी या व्यासपीठावरून महाराष्ट्रातील आणि देशभरातील लोकांना हे सांगायला आलो आहे की, जिथे कुठे काँग्रेसचे नेते दिसतील,

त्यांना विचारा की निवडणूक लढणे, हरणे किंवा जिंकणे हे पक्षाच्या नेत्यांच्या कामगिरीवर अवलंबून असते का? तुम्हाला 10 वर्षांची संधी देण्यात आली, पण तुम्ही 12 लाख कोटी रुपयांचा घोटाळा आणि भ्रष्टाचार केला. देशातील जनतेने तुमचा हात धरून तुम्हाला थेट केंद्रातूनच बाहेर काढले. त्यांनी



नरेंद्र मोदींना पंतप्रधान बनवलं. 12 वर्षांत नरेंद्र मोदींवर एका पैशाच्या भ्रष्टाचाराचाही आरोप झालेला नाही."

पुणेकरांना संबोधताना अमित शाह पुढे म्हणाले की, "कृषी क्षेत्र असो, औद्योगिक विकास असो, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणे असो, स्टार्टअप इकोसिस्टम तयार करणे असो, रेल्वेचे पुनरुज्जीवन करणे असो, विमानतळांची संख्या 76 वरून 150 पर्यंत वाढवणे असो, सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क उभारणे असो, नवीन शिक्षण धोरण आणणे असो किंवा सहकार मंत्रालयाची निर्मिती करणे असो, या सर्व गोष्टी गेल्या 12 वर्षांत घडल्या आहेत.

तुम्हाला सत्ता हवीये का? मग तुम्ही...

अमित शाह यांनी भर सभेतून राहुल गांधी यांना एक महत्त्वाचा सल्ला सुद्धा दिला आहे. अमित शाह सल्ला देताना म्हणाले की, "मला राहुल गांधींना सल्ला द्यायचा आहे की, अशा आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये भारताची बदनामी करून तुम्हाला सत्ता मिळणार नाही. जर तुम्हाला सत्ता हवी असेल, तर परदेश दौरे करणे थांबवा आणि देशातील प्रत्येक खेड्यापाड्यांना, तळागाळातील गावांना भेटी द्यायला सुरुवात करा. मग तुम्ही कदाचित सत्तेमध्ये येऊ शकाल. जग नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाची प्रशंसा करत असतानाही, तुम्ही मोदी आणि भारताच्या विकासाच्या प्रवासाला बदनाम करण्याचे काम करत आहात. तुम्ही ऐकणार नाही, पण मला काँग्रेस कार्यकर्त्यांना सांगायचे आहे की, जर तुम्ही याच दिशेने त्यांचे अनुकरण केले, तर पुढील 30 वर्षे तुम्हाला संधी मिळणार नाही."

केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, "मला सांगा, सत्ताधारी पक्ष असो वा विरोधी पक्ष, तुम्ही आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताची किंवा भारताच्या पंतप्रधानांची बदनामी करू शकता का? संपूर्ण देशाला वाटते की राहुल गांधींनी जमिनीवर यावे आणि गावांना भेट द्यावी. पण मला माहित आहे की तुम्ही थोड्या दिवसांतच परदेशामध्ये जाऊन स्थायिक होणार आहेत. अशा प्रकारे तुमची सत्तेची महत्त्वाकांक्षा पूर्ण होणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत, भारताची विकासगाथा, भारताची लोकशाही आणि भारतीय पंतप्रधानांची बदनामी करण्याच्या राहुल गांधींच्या प्रयत्नाचा मी तीव्र निषेध करतो. मी भारताच्या जनतेलाही आवाहन करतो की त्यांनी आगामी निवडणुकीत विरोधी पक्षाला जोरदार प्रत्युत्तर द्यावे."

केंद्र सरकारकडून आदिवासी बांधवांवर योजनांचा पाऊस, समाजाचे पालटणार जीवन

मुंबई: भारतात आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणि त्यांच्या संस्कृतीच्या जतनासाठी केंद्र सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. भगवान बिरसा मुंडा यांच्या 151 व्या जयंती निमित्त आयोजित 'जनजातीय गौरव दिवस' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून तब्बल 3000 कोटी रुपयांच्या 246 विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली आहे. आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या या प्रकल्पांमुळे देशातील आदिवासी समाजाचे यामुळे चित्र पालटणार आहे. यात 38 एकलव्य मॉडेल निवासी शाळा (EMRS) आणि पीएम-जन्मन (PM-JANMAN) अंतर्गत 100 बहुउद्देशीय केंद्रांचे लोकार्पण करण्यात आले आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव देण्यासाठी आणि त्यांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी आणखी 19 नवीन एकलव्य शाळांची पायाभरणीही यावेळी करण्यात आली आहे.

एकूण प्रकल्पांपैकी, पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते 173 उपक्रमांचे उद्घाटन करण्यात येणार आहेत. ही केंद्रे अत्यावश्यक सेवा पुरवण्यासाठी आणि विविध समुदाय-स्तरीय उपक्रमांना चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून काम करतील. मोदींच्या हस्ते, पीएम-जनमन आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA) अंतर्गत इतर विविध प्रकल्पांचे उद्घाटनही करणार आहेत. उद्घाटन होणाऱ्या इतर प्रमुख प्रकल्पांमध्ये आदिवासी संस्कृती आणि वारसा जतन करण्याच्या उद्देशाने अरुणाचल प्रदेशातील इटानगरमध्ये आदिवासी संशोधन संस्था (TRI) इमारत आणि मिझोरममधील ऐझॉल येथील 'रोपुइलियानी आदिवासी स्वातंत्र्यसेनानी संग्रहालय' यांचा समावेश आहे. हे संग्रहालय मिझो जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांचे शौर्य, पराक्रम आणि त्याग यांचे स्मरण करते, तसेच मिझो लोकांच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि परंपरेचे प्रदर्शन करते.

पंतप्रधानांच्या हस्ते, 19 नवीन एकलव्य मॉडेल निवासी शाळांची पायाभरणी करण्यात येणार आहे. या माध्यमातून केंद्र सरकार आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण देणार आहे. ते आदिवासी उत्पादकांसाठी बाजारपेठ उपलब्धता मजबूत करण्यासाठी 12 आदिवासी बहुउद्देशीय विपणन केंद्रांची (TMMC) पायाभरणीही करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, पंतप्रधान मोदी PM-JANMAN आणि DAJGUA अंतर्गत इतर 42 प्रकल्पांचेही भूमिपूजन करतील. हा कार्यक्रम 1 नोव्हेंबर ते 15 नोव्हेंबर दरम्यान देशभरात साजरा करण्यात येणार आहे.

'जनजातीय गौरव पखवाडा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे भुमिपूजन करण्यात येणार आहे. पखवाडादरम्यान, सरकारकडून EMRS विद्यार्थ्यांसोबत संवाद, राष्ट्रीय आदिवासी साहित्य महोत्सव, आदिवासी वैद्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, विशेषतः असुरक्षित आदिवासी गटांसाठी (पीव्हीटीजी) आरोग्य आणि पोषण शिबिरे आणि धरती आबा जनभागीदारी अभियानांतर्गत आदिवासी गावांमध्ये समाजसेवा मोहीम यांसारख्या विविध राष्ट्रीय आणि तळागाळातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

लखनौ

आणखी 25 लाख तरुणांना डिजिटल उपकरणे देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, टॅब्लेट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी महत्त्वाचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी या उपकरणांचा वापर ज्ञान वाढवण्यासाठी आणि उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी करावा.

18 हजारांहून अधिक अभ्यासक्रमांसाठी मोफत डिजिटल साहित्य

इन्फोसिसच्या सहकार्याने सरकारने 18 हजारांहून अधिक अभ्यासक्रमांसाठी मोफत डिजिटल अभ्यास साहित्य उपलब्ध करून दिले आहे. यामध्ये योगापासून आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि डीप टेकसारख्या आधुनिक विषयांचा समावेश आहे. 'युवा साथी' ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मुख्यमंत्री कन्या सुमंगला योजना, पंतप्रधान इंटर्नशिप योजना, मुख्यमंत्री युवा उद्योजकता विकास मोहीम आणि पीएम मुद्रा योजना यांसारख्या सरकारी योजनांची माहिती मिळणार आहे. कोविड-19 महामारीमुळे

ठाणे जिल्ह्यातील कोतवाल भरती परीक्षेची तारीख बदलली

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील महसूल सेवक (कोतवाल) पदाच्या भरतीची वाट पाहणाऱ्या हजारो तरुणांसाठी एक महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. प्रशासनाने या भरती प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले असून, आधी ठरलेली तारीख बदलण्यात आली आहे. यामुळे आता उमेदवारांना परीक्षेसाठी आणखी काही काळ मिळाला आहे. ठाणे, कल्याण, मुरबाड, अंबरनाथ, भिवंडी आणि शहापूर या 6 तालुक्यांतील रिक्त पदांसाठी ही भरती प्रक्रिया अत्यंत वेगाने राबविण्यात येत आहे.

शासनाच्या निर्देशानुसार परीक्षा पुढे ढकलली

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे जिल्ह्यातील महसूल सेवक (कोतवाल) पदांच्या भरतीसाठी यापूर्वी 15 नोव्हेंबर 2026 रोजी लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार आणि शासनाच्या सहसचिवांनी 12 नोव्हेंबर 2026 रोजी दिलेल्या विशेष पत्रानुसार ही परीक्षा पुढे ढकलण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. याबाबत महसूल सेवक निवड समितीचे अध्यक्ष तथा उल्हासनगरचे उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

प्रशासनाने जाहीर केलेल्या नव्या आणि सुधारित वेळापत्रकानुसार भरती प्रक्रियेचे टप्पे खालीलप्रमाणे असणार आहेत: 23 ते 30 नोव्हेंबर 2026 या कालावधीत तालुकानिहाय रिक्त जागांची अचूक यादी तयार केली जाईल. 1 ते 15 डिसेंबर दरम्यान रिक्त जागांनुसार बिंदुनामावली (रॉस्टर) तयार करण्याचे काम पार पडेल. 15 डिसेंबर रोजी अधिकृत भरती समितीची स्थापना केली जाणार आहे. 16 ते 31 डिसेंबर या कालावधीत भरतीची नवीन जाहिरात सर्वत्र प्रसिद्ध केली जाईल. प्राप्त झालेल्या अर्जांची कसून छाननी 1 ते 7 जानेवारी 2027 या कालावधीत केली जाईल. पात्र उमेदवारांना 8 ते 16 जानेवारी दरम्यान अधिकृत प्रवेशपत्र (Admit Card) उपलब्ध करून दिले जाईल.

सर्व टप्पे पार पडल्यानंतर अखेर 17 जानेवारी 2027 रोजी मुख्य लेखी परीक्षा घेतली जाणार आहे.

25 लाख तरुणांना मोफत टॅब्लेट, 1 लाख सरकारी नोकऱ्यांची घोषणा

लखनौ : उत्तर प्रदेशातील तरुणांसाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोठ्या घोषणा केल्या आहेत. स्वामी विवेकानंद युवा सक्षमीकरण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत राज्यातील आणखी 25 लाख तरुणांना टॅब्लेट वितरित करण्यात येणार आहेत. तसेच, येत्या 26 जानेवारीपर्यंत 1 लाखांहून अधिक तरुणांना सरकारी नोकऱ्यांची नियुक्तीपत्रे देण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली. भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव दिनानिमित्त लखनौ येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

चार जिल्ह्यांतील 53 हजार विद्यार्थ्यांना टॅब्लेटचे वाटप

लखनौ येथील राष्ट्रीय प्रेरणा स्थळावर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते लखनौ, सीतापूर, हरदोई आणि उन्नाव या 4 जिल्ह्यांतील 53 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना टॅब्लेटचे वाटप करण्यात आले. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात आतापर्यंत 60 लाख तरुणांना टॅब्लेट आणि स्मार्टफोन देण्यात आले आहेत. आता दुसऱ्या टप्प्यात

पनवेलच्या स्टील मार्केटमध्ये भीषण आग! थिनरच्या ड्रमचा मोठा स्फोट, अग्निशमन जवान जखमी

मुंबई : नवी मुंबईमधील पनवेल परिसरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. कळंबोली येथील स्टील मार्केटमधील एका गॅरेज आणि गोदामाला भीषण आग लागली आहे. स्टील मार्केट परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. परंतु आग विझवताना मोठा स्फोट झाला. या घटनेत एक अग्निशमन कर्मचारी जखमी झाला असून, जागेचा मालक सध्या फरार आहे. सदर घटना रविवारी घडली आहे.

जखमी अग्निशमन जवानाला सत्यम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर नागरिकाला एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. यासंदर्भात, उप अग्निशमन अधिकारी मनीष ब्रह्मंकर यांनी सांगितले की, त्यांना सुरुवातीला एका दुकानात आग लागल्याची माहिती समजली होती. त्यामुळे त्यांनी "रात्री सुमारे साडेदहा वाजताच्या सुमारास, नियंत्रण कक्षाला एका दुकानात आग लागल्याचा फोन आला होता. त्या माहितीच्या आधारे आम्ही तात्काळ अग्निशमन दलाला घटनास्थळी रवाना केले.



घटनास्थळी पोहोचल्यावर आमच्या लक्षात आले की, आग दुकानात नसून एका गॅरेज आणि गोदामात लागली होती."

तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार, गोदामात कोणती रसायने साठवली आहेत याची अग्निशमन दलाला आधी कल्पना नव्हती. "अचानक एक मोठा स्फोट झाला. नंतर आम्हाला समजले की, आत ठेवलेल्या थिनरच्या अनेक ड्रममुळे हा स्फोट झाला आहे. या स्फोटात आमचा एक अग्निशमन कर्मचारी जखमी झाला आहे. तो 5 ते 6 टक्के भाजला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.", असे उप अग्निशमन अधिकारी मनीष ब्रह्मंकर यांनी माहिती देताना सांगितले. (Garage Fire Incident)

दरम्यान, घटनेपासून गोदामाचा आणि गॅरेजचा मालक बेपत्ता झाला आहे. यासंदर्भात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात आगीचे कारण अद्याप निश्चित झालेले नाही. पोलीस आणि अग्निशमन दलाची पथके सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

एका दलालाने एवढे बोलू नये... : मंत्री संजय शिरसाठ यांची चौफेर ठोलेबाजी

छत्रपती संभाजीनगर : आज छत्रपती संभाजीनगर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत मंत्री संजय शिरसाट (Sanjay Shirsat) यांनी विविध राजकीय घडामोडींवर आणि स्थानिक प्रश्नांवर आपली रोखठोक भूमिका मांडली. या पत्रकार परिषदेत त्यांनी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांच्या आरोपांना अत्यंत तिखट शब्दांत प्रत्युत्तर दिले, तर दुसरीकडे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि खासदार संजय राऊत यांच्यावरही उपरोधिक टोलेबाजी केली. यासोबतच शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या रिंगरोड प्रकल्पाचा 'ॲक्शन प्लॅन' तयार असल्याची महत्त्वपूर्ण माहितीही त्यांनी दिली.

घरावरील हल्ल्यानंतर होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर बोलताना संजय शिरसाट यांनी इम्तियाज जलील यांच्यावर अत्यंत कडक शब्दांत हल्लाबोल केला. जलील यांची तुलना विजेच्या दिव्याशी करत "त्यांची लायकी काय ? दलाली करणे हा आमचा धंदा नाही," असा घणाघात त्यांनी केला. आपण बकवास करणाऱ्या लोकांची वक्तव्ये मनावर घेत नसल्याचे सांगत, अधिकाऱ्यांकडून खुशाल माहिती घ्यावी; जर एकानेही माझ्यावर पैशांच्या व्यवहाराचा आरोप सिद्ध केला, तर मी राजकारण सोडेन, असे थेट आव्हानही शिरसाट यांनी दिले. तसेच, निदा खान प्रकरणाची आठवण करून देत, "निदा खान प्रकरणाचे काय झाले ते पाहा, आता तुझ्यावरच जेलमध्ये जाण्याची वेळ आली आहे, त्यामुळे एका दलालाने एवढे बोलू नये," असा इशाराही त्यांनी जलील यांना दिला. दरम्यान, शहरात सध्या चर्चेत असलेल्या मफलरच्या फोटो आणि पोस्टर वादावर बोलताना त्यांनी आपले हात झटकले. ते पोस्टर कोणी आणि कोणत्या उद्देशाने लावले याची आपल्याला कोणतीही माहिती नसून, ज्यांनी ते लावले त्यांनीच उत्तर द्यावे, या सर्व घडामोडींचा सोक्षमोक्ष लवकरच लागेल, असे ते म्हणाले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावर टिप्पणी करताना शिरसाट यांनी उपरोधिक भाष्य केले. "अंबादास दानवे हे खूप विद्वान असून त्यांच्याकडे जगातील माहितीचा भांडार आहे. अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबतही माहिती हवी असेल, तर ती त्यांच्याकडेच मिळेल. त्यामुळे माझ्यासारख्या छोट्या माणसाने त्यांना प्रत्युत्तर देणे योग्य नाही," असा चिमटा त्यांनी काढला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांवर बोलताना त्यांनी खासदार सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांच्या विधानांचा समाचार घेतला. सुप्रिया सुळे या पवार कुटुंबातील असल्याने त्यांचे वक्तव्य महत्त्वाचे असून ते चुकीचे म्हणता येणार नाही; जर विलीनीकरणाच्या विषयावर आता सर्वजण 'फुलस्टॉप' म्हणत असतील, तर ते चांगलेच आहे, दिल्लीतील प्रत्येक भेटीचा संबंध विलीनीकरणाशी जोडणे योग्य नाही, असे शिरसाट म्हणाले. मात्र, संजय राऊत यांनी या चर्चेला 'दंतकथा' म्हटल्याबद्दल टोमणा मारताना ते म्हणाले की, "राऊतांनी एखाद्या गोष्टीला दंतकथा म्हटले, म्हणजे निश्चितच काहीतरी घडणार आणि नेमके त्यांच्या बोलण्याच्या उलटेच घडणार! राऊतांच्या विधानाप्रमाणेच घडले, तर अनेक मोठे नेते तोंडघशी पडतील."

राज्यातील इतर प्रश्नांवर बोलताना त्यांनी नाना पटोले यांच्या फोन टॅपिंगच्या आरोपांची चौकशी आणि स्पष्टीकरण केंद्र सरकार करेल असे सांगितले, तर राज्यातील वाघांच्या दहशतीवर वनमंत्री गांभीर्याने उपाययोजना करत असल्याचा विश्वास व्यक्त केला. मुंबईतील सीएसएमटी परिसरातील वृक्षतोडीबाबत बोलताना, विकासकामांमुळे जुनी झाडे तोडावी लागणे दुःखद असले तरी त्याबदल्यात दुप्पट-तिप्पट झाडे लावली गेल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, अमरावतीमधील अधिकाऱ्यांच्या वादावर आणि पार्टीच्या व्हायरल प्रकारावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

"राजकारण्यांच्या ताटात साधे काजू दिसले तरी मोठ्या बातम्या होतात, त्यामुळे अधिकाऱ्यांनी असे नाटक न करता आपल्या पदाचे आणि जबाबदारीचे गांभीर्य राखले पाहिजे," असा सल्ला त्यांनी दिला. पत्रकार परिषदेच्या शेवटी त्यांनी छत्रपती संभाजीनगरच्या रिंगरोड प्रकल्पाबाबत मोठी अपडेट दिली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

टीम इंडियाचा न्यूझीलंडवर ऐतिहासिक मालिका विजय

क्रिकेटच्या वादळी आणि रोमांचक सामन्यांमध्ये कधीकधी कमी धावसंख्येचे सामनेही इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिले जातात, याचे उत्तम उदाहरण माउंट मौनगानुई येथील बे ओव्हल मैदानावर पाहायला मिळाले. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील अंतिम व पाचव्या सामन्यात भारतीय संघाने अत्यंत नाट्यमय आणि जिद्दीच्या बळावर किवी संघाचा २२ धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने पाच सामन्यांची ही मालिका ३-१ अशा दणदणीत फरकाने आपल्या नावावर करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाची सुरुवात संमिश्र राहिली आणि न्यूझीलंडच्या टिचून दिलेल्या गोलंदाजीपुढे संपूर्ण संघ ४२.१ षटकांत अवघ्या २०९ धावांवर बाद झाला. इशान किशन आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत भारताला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. मात्र, २१० धावांचे माफक लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडच्या संघाला भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच खिंडीत पकडले. वेगवान आणि फिरकी गोलंदाजीच्या अचूक मारामुळे किवी फलंदाजांवर प्रचंड दबाव निर्माण झाला. एकामागून एक गडप झालेल्या विकेट्समुळे सामना अतिशय रोमांचक वळणावर आला होता, परंतु अर्शदीप सिंगची घातक गोलंदाजी आणि अक्षर पटेलची अष्टपैलू कामगिरी निर्णायक ठरली. अर्शदीप सिंगने १० षटकांत केवळ ३० धावा देत ३ महत्त्वपूर्ण बळी टिपले आणि तो 'सामनावीर' ठरला. त्याला मोहम्मद सिराज व अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेत उत्तम साथ दिली, तर यश ठाकूर, आकिब नबी आणि नमन धीर यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला. अखेरच्या षटकांत अक्षर पटेलने ब्लेअर टिकनरला बाद करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आणि न्यूझीलंडचा डाव १८७ धावांवर संपुष्टात आणला. चौथ्या सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाने ज्या शिस्तीने आणि सांघिक जिद्दीने पुनरागमन केले, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. गोलंदाजांच्या शिस्तबद्ध माऱ्याच्या जोरावर मिळवलेला हा विजय टीम इंडियाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवणारा ठरला आहे.

राहुरी साठवून ठेवलेल्या 50 गोण्या कापसाची चोरी

राहुरी :तालुक्यातील ब्राह्मणी येथील राजदेव वस्ती परिसरात शेतकऱ्याच्या शेतातील कापूस चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी पत्र्याच्या शेडमध्ये साठवून ठेवलेल्या तब्बल ५० गोण्या कापूस चोरून नेला असून, या घटनेत सुमारे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नासिर अर्शद इनामदार, वय २९ वर्षे, रा. राजदेव वस्ती, ब्राह्मणी, ता. राहुरी, यांनी आपल्या शेतात कापसाचे पीक घेतले होते. दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांनी मजुरांच्या मदतीने शेतातील कापसाची वेचणी करून सुमारे ५० गोण्या कापूस घराशेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये साठवून ठेवला होता. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास इनामदार व त्यांचे कुटुंबीय जेवण करून झोपले होते. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी शेडमध्ये ठेवलेल्या ५० गोण्या कापूस चोरून नेला. दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी झोपेतून उठल्यानंतर कापूस चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या प्रकरणी नासिर अर्शद इनामदार यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १२३५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहे.

जुहू बीचवर स्वच्छता मोहिमेची घोषणा

मुंबई : आपल्या छठपूजा महोत्सवाच्या २९ व्या वर्षानिमित्त श्री संजय निरुपम यांच्या पुढाकाराने, बिहारी फ्रंटच्या वतीने १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी जुहू बीच येथे भव्य दोन दिवसीय छठपूजा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'गंगेच्या घाटापासून जुहूच्या तटापर्यंत' या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव बिहार आणि पूर्वांचलमधून मुंबईत स्थायिक झालेल्या नागरिकांच्या भावनिक प्रवासाचे प्रतीक आहे. परंपरेनुसार छठपूजा आपल्या मूळ गावी नदीच्या किनारी आणि घाटांवर साजरी केली जाते. मात्र, आज मुंबई हेच आपले घर मानणाऱ्या या नागरिकांसाठी जुहूचा समुद्रकिनारा श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक एकात्मतेचे नवे ठिकाण बनले आहे.

सहिष्णुता : सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा आधार

दरवर्षी १६ नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन' म्हणून साजरा केला जातो. विविध धर्म, भाषा, संस्कृती, परंपरा, विचारधारा आणि जीवनपद्धती असलेल्या समाजघटकांमध्ये परस्पर आदर, समजूतदारपणा, स्वीकारशीलता आणि बंधुभाव निर्माण व्हावा, हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. मानवसमाजाची रचना विविधतेवर आधारलेली आहे. प्रत्येक व्यक्तीचे विचार, श्रद्धा, आवडीनिवडी, जीवनशैली आणि सामाजिक अनुभव वेगवेगळे असतात. ही विविधता समाजाचे वैभव असते. मात्र, या विविधतेचा स्वीकार करण्याऐवजी तिच्याकडे संशयाने, तुच्छतेने किंवा द्वेषाच्या भावनेने पाहिले, तर सामाजिक संघर्ष, भेदभाव आणि हिंसाचाराला खतपाणी मिळते. म्हणूनच शांततापूर्ण, न्याय्य आणि समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी सहिष्णुता हे अत्यंत महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. सहिष्णुता म्हणजे केवळ दुसऱ्याचे विचार सहन करणे नव्हे, तर त्याच्या वेगळेपणाचा आदर करून त्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार मान्य करणे होय.

आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या संकल्पनेला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) १९९५ हे वर्ष सहिष्णुतेसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले होते. त्याच वर्षी १६ नोव्हेंबर रोजी युनेस्कोच्या सदस्य राष्ट्रांनी 'सहिष्णुतेच्या तत्त्वांविषयीची घोषणा' स्वीकारली. या घोषणेमध्ये सहिष्णुतेला शांतता, लोकशाही, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचा महत्त्वपूर्ण आधार मानण्यात आले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने १९९६ मध्ये १६ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन म्हणून पाळण्याचे आवाहन केले. जगभरातील समाजांमध्ये वाढणारा धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि वैचारिक संघर्ष कमी करून परस्पर समजूतदारपणा वाढविणे, हा या दिवसाचा व्यापक हेतू आहे. त्यामुळे हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी संधी आहे.

सहिष्णुता ही संकल्पना व्यापक आणि बहुआयामी आहे. व्यक्तीचे विचार आपल्यापेक्षा वेगळे असू शकतात, तिची धार्मिक श्रद्धा आपल्यापेक्षा भिन्न असू शकते किंवा तिची जीवनशैली आपल्या परंपरेशी जुळणारी नसू शकते. मात्र, या कारणांमुळे त्या व्यक्तीचा अवमान करणे, तिच्यावर बंधने लादणे किंवा तिच्या अधिकारांचे उल्लंघन करणे योग्य ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार मांडण्याचे, श्रद्धा बाळगण्याचे, संस्कृतीचे पालन करण्याचे आणि सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता. सहिष्णुता ही दुर्बलता नसून मानसिक परिपक्वता, विवेकशीलता आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. स्वतःच्या मतांवर ठाम राहूनही दुसऱ्याच्या मतांचा आदर करता येणे, ही खऱ्या अर्थाने सहिष्णु वृत्ती होय. अर्थात, सहिष्णुता म्हणजे अन्याय, शोषण, हिंसा, अत्याचार किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन मुकाटपणे सहन करणे नव्हे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविताना मानवी प्रतिष्ठेचा आदर राखणे आणि विवेकपूर्ण मार्गाने संघर्ष करणेही तितकेच आवश्यक आहे.

भारतीय समाजाच्या रचनेमध्ये सहिष्णुतेला विशेष महत्त्व आहे. भारत हा विविध धर्म, भाषा, जाती, जमाती, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती, वेशभूषा, सण-उत्सव आणि सामाजिक चालीरीती वेगवेगळ्या आहेत. तरीही या विविधतेमध्ये एकात्मतेची भावना टिकून आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार प्रदान केले आहेत. संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे. ही मूल्ये सहिष्णुतेच्या पायावर उभी आहेत. धर्म, भाषा, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्या आधारावर कोणताही नागरिक कनिष्ठ ठरू नये, ही भारतीय लोकशाहीची मूलभूत भूमिका आहे. त्यामुळे सहिष्णुता ही केवळ वैयक्तिक सद्गुणाची बाब नसून भारतीय संविधानिक लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेले सामाजिक मूल्य आहे.

भारतीय इतिहासात विविध विचारप्रवाह, तत्त्वज्ञान आणि सामाजिक चळवळींनी सहिष्णुतेची शिकवण दिलेली आहे. तथागत गौतम बुद्धांनी करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसेच्या माध्यमातून मानवतेचा संदेश दिला. व्यक्तीने विवेकाचा वापर करून सत्याचा शोध घ्यावा आणि सर्व प्राणिमात्रांविषयी करुणेची भावना ठेवावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. सम्राट अशोकाने कलिंग युद्धानंतर हिंसेचा त्याग करून धम्मविजयाचा मार्ग स्वीकारला. विविध धार्मिक संप्रदायांविषयी आदर बाळगण्याचा आणि परस्परांचा सन्मान करण्याचा संदेश त्याने दिला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत नामदेव आणि इतर संतपरंपरेतील विचारवंतांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक विषमता, जातिभेद आणि स्त्रीशिक्षणावरील बंधने यांविरुद्ध संघर्ष केला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि समतेसाठी कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीचा विचार मांडला. या सर्व विचारवंतांच्या कार्यातून सहिष्णुता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व स्पष्ट होते.

सहिष्णुतेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आदर. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या श्रद्धेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचा भाग असली, तरी तिचा वापर दुसऱ्या व्यक्तीविषयी द्वेष निर्माण करण्यासाठी होऊ नये. कोणताही धर्म मानवतेपेक्षा मोठा नाही आणि कोणतीही धार्मिक ओळख दुसऱ्या व्यक्तीचा अपमान करण्याचा अधिकार देत नाही. धार्मिक विविधतेचा स्वीकार करून परस्परांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे, एकमेकांच्या परंपरांची माहिती घेणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे आवश्यक आहे. सांस्कृतिक सहिष्णुतेमुळे विविध समुदायांमधील अंतर कमी होते. लोक एकमेकांच्या जीवनपद्धती समजून घेतात आणि परस्परांविषयी विश्वास निर्माण होतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक बळकट होते.

भारतीय समाजात भाषिक सहिष्णुतेलाही विशेष महत्त्व आहे. भारतामध्ये अनेक भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक वारसा आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा अवमान होऊ नये. भाषिक विविधतेचा स्वीकार केल्याने सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाच्या भाषा, बोली, लोककला, परंपरा आणि ज्ञानपद्धती यांचे जतन करणे हीदेखील सहिष्णुतेची व्यापक अभिव्यक्ती आहे. वारली, भिल्ल, कोकणा आणि इतर आदिवासी समुदायांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे मागासलेपणाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांना समाजाच्या सांस्कृतिक संपत्तीचा भाग मानले पाहिजे. विविधतेचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने समावेशक आणि प्रगतिशील ठरतो.

आजच्या काळात जातीय आणि सामाजिक सहिष्णुतेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. भारतीय समाजात जात, वर्ग, लिंग, आर्थिक स्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या आधारावर अनेक प्रकारच्या विषमता आढळतात. अस्पृश्यता, जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, स्त्री-पुरुष असमानता आणि वंचित घटकांवरील अन्याय या समस्या अजूनही पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत सहिष्णुतेचा अर्थ केवळ वेगवेगळ्या समुदायांना एकत्र राहू देणे एवढाच मर्यादित असता कामा नये. प्रत्येक व्यक्तीला समान संधी, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यामध्ये असली पाहिजे. समाजातील दुर्बल, वंचित, आदिवासी, अल्पसंख्याक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या समस्या समजून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि त्यांच्या अधिकारांसाठी सकारात्मक भूमिका घेणे ही सामाजिक सहिष्णुतेची खरी कसोटी आहे.

सहिष्णु समाजनिर्मितीमध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण हे केवळ माहिती आणि ज्ञान संपादन करण्याचे साधन नसून व्यक्तीच्या विचारसरणीला आकार देणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विवेकनिष्ठ विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करता येते. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि समाजघटकांविषयी वस्तुनिष्ठ माहिती दिली पाहिजे. विद्यार्थ्यांना परस्परांच्या मतांचा आदर करण्याची, मतभेद शांततेने सोडविण्याची आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला विरोध करण्याची शिकवण मिळाली पाहिजे. वादविवाद, समूहचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम यांच्या माध्यमातून सहिष्णुतेची मूल्ये रुजविता येतात. शिक्षकांनी आपल्या वर्तनातून समानता, न्याय, आदर आणि सहकार्याचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुता ही केवळ पाठ्यपुस्तकातून शिकण्याची गोष्ट नसून दैनंदिन व्यवहारातून आत्मसात करण्याचे जीवनमूल्य आहे.

लोकशाही व्यवस्थेच्या यशासाठीदेखील सहिष्णुता अपरिहार्य आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, शासनाच्या धोरणांवर टीका करण्याचा आणि सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याचा अधिकार असतो. मात्र, मतभिन्नता निर्माण झाली म्हणून विरोधकांना शत्रू समजणे ही लोकशाहीविरोधी मानसिकता आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मतांचा आदर करणे, शांततापूर्ण चर्चा करणे आणि तर्काच्या आधारे मतपरिवर्तन स्वीकारणे आवश्यक असते. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक नेतृत्व यांनी आपल्या भाषणातून आणि कृतीतून सामाजिक सलोखा टिकविण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. मतभेद असणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे; परंतु मनभेद, द्वेष आणि हिंसाचार निर्माण होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे वैचारिक मतभिन्नतेला संघर्षाचे नव्हे, तर संवादाचे माध्यम बनविणे गरजेचे आहे.

जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे जग जवळ आले आहे. विविध देशांतील लोकांचे विचार, संस्कृती आणि जीवनशैली यांच्याशी परिचित होण्याच्या संधी वाढल्या आहेत. त्याचबरोबर सांस्कृतिक गैरसमज, धार्मिक पूर्वग्रह, वांशिक भेदभाव आणि असहिष्णुतेच्या घटनाही अनेक ठिकाणी दिसून येतात. स्थलांतरित नागरिक, निर्वासित आणि अल्पसंख्याक समुदायांना अनेकदा सामाजिक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. वंश, त्वचेचा रंग, राष्ट्रीयत्व किंवा सांस्कृतिक ओळख यांच्या आधारावर व्यक्तीचे मूल्यमापन करणे ही अन्यायकारक प्रवृत्ती आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य, संवाद आणि परस्पर आदर आवश्यक आहे. युद्ध, दहशतवाद, धार्मिक कट्टरता आणि हिंसक संघर्ष यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन मानवतेच्या समान मूल्यांची आठवण करून देतो.

डिजिटल युगामध्ये सहिष्णुतेसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. समाजमाध्यमांमुळे प्रत्येक व्यक्तीला आपले मत व्यक्त करण्यासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. मात्र, त्याच माध्यमांचा वापर करून अफवा, द्वेषपूर्ण संदेश, दिशाभूल करणारी माहिती आणि अपमानास्पद मजकूर पसरविला जात आहे. अनेकदा एखाद्या घटनेची सत्यता पडताळून न पाहता संदेश पुढे पाठविले जातात. धार्मिक, जातीय किंवा राजकीय विषयांवरून समाजमाध्यमांमध्ये परस्परांविषयी द्वेष निर्माण केला जातो. आभासी जगातील अशा वर्तनाचे परिणाम प्रत्यक्ष सामाजिक जीवनावर होऊ शकतात. त्यामुळे डिजिटल सहिष्णुता ही काळाची गरज बनली आहे. समाजमाध्यमांवर मत व्यक्त करताना भाषेचे भान ठेवणे, दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आदर करणे, माहितीची सत्यता तपासणे आणि द्वेषपूर्ण मजकूर प्रसारित न करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ दुसऱ्याचा अपमान करण्याचे स्वातंत्र्य असा होत नाही. जबाबदार डिजिटल नागरिकत्व हे सहिष्णु समाजाच्या निर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे.

कुटुंब ही सहिष्णुतेची पहिली पाठशाळा आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कुटुंबातील वातावरणातून होत असते. पालकांनी मुलांना लहानपणापासूनच सर्व व्यक्तींशी आदराने वागण्याची शिकवण दिली पाहिजे. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करणे, घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवांचा आदर करणे, लहानांच्या मतांना महत्त्व देणे आणि कुटुंबातील मतभेद संवादातून सोडविणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी मैत्री करण्यास मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुसऱ्याच्या अडचणी समजून घेणे, गरजू व्यक्तींना मदत करणे आणि कोणाचाही अपमान न करणे या सवयी बालपणापासून विकसित झाल्या, तर भविष्यात संवेदनशील नागरिक घडू शकतात. सहिष्णुता ही केवळ सार्वजनिक जीवनापुरती मर्यादित नसून कुटुंबातील नातेसंबंध अधिक सुदृढ करणारी भावना आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही सहिष्णुतेचे महत्त्व अधोरेखित करावे लागते. महिलांना शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, निर्णयप्रक्रिया आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांमध्ये समान संधी मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या विचारांना, आवडीनिवडींना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला मान्यता देणे ही सहिष्णुतेचीच अभिव्यक्ती आहे. त्याचप्रमाणे तृतीयपंथीय व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील इतर दुर्लक्षित घटक यांच्या अस्तित्वाचा व अधिकारांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या शारीरिक स्थिती, लिंगभाव, सामाजिक ओळख किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारे तिच्याशी भेदभाव केला जाऊ नये. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता यावे, यासाठी सार्वजनिक सुविधा, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सहिष्णुता आणि समावेशकता यांचा समन्वय साधल्याशिवाय सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही.

आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी करण्यासाठीही सहिष्णु दृष्टिकोन आवश्यक आहे. समाजातील श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण, शिक्षित आणि अशिक्षित तसेच विकसित आणि अविकसित भागांतील अंतर कमी करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींकडे तुच्छतेने पाहण्याऐवजी त्यांच्या परिस्थितीमागील सामाजिक आणि आर्थिक कारणे समजून घेतली पाहिजेत. रोजगार, आरोग्य, शिक्षण, निवारा आणि सामाजिक सुरक्षा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी शासनाबरोबरच सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला पाहिजे. सहिष्णु समाज हा केवळ विविधतेचा स्वीकार करणारा नसतो, तर प्रत्येक व्यक्तीला प्रगतीची समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न करणारा समाज असतो. त्यामुळे सहिष्णुतेचा संबंध सामाजिक उत्तरदायित्व आणि कल्याणकारी विकासाशीही जोडलेला आहे.

सहिष्णुता वाढविण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांनी सामाजिक प्रश्न मांडताना वस्तुनिष्ठता आणि जबाबदारीचे भान राखले पाहिजे. विविध समुदायांमधील सकारात्मक उपक्रम, सामाजिक सहकार्य आणि एकात्मतेच्या उदाहरणांना प्रसिद्धी दिली पाहिजे. सामाजिक संस्थांनी आंतरधर्मीय संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण, युवक शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. सार्वजनिक ठिकाणी भेदभावविरहित वर्तनाला प्रोत्साहन दिले पाहिजे. द्वेषपूर्ण भाषण, सामाजिक बहिष्कार आणि हिंसक प्रवृत्ती यांना कायद्याच्या चौकटीत प्रतिबंध करणेही आवश्यक आहे. सहिष्णुतेचे मूल्य समाजात रुजविण्यासाठी केवळ एका दिवसाचे कार्यक्रम पुरेसे नसून त्याची अंमलबजावणी दैनंदिन जीवनात होणे महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन हा प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरात, कार्यस्थळी, शैक्षणिक संस्थेत आणि सार्वजनिक जीवनात इतरांशी कसे वागतो, याचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्यापेक्षा वेगळे विचार मांडणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकण्याची तयारी आहे का, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आपण आदर करतो का, भेदभावाच्या घटनांविरुद्ध आपण भूमिका घेतो का आणि समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी आपले योगदान काय आहे, असे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. सहिष्णुतेची सुरुवात व्यक्तीच्या मनातून होते आणि तिचा विस्तार कुटुंब, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण जगापर्यंत होतो. छोट्या-छोट्या कृतींमधूनही मोठे सामाजिक परिवर्तन घडविता येते.

आज मानवजातीला विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाबरोबरच मानवी संवेदनशीलतेचीही नितांत गरज आहे. भौतिक प्रगतीच्या शर्यतीत माणुसकी, परस्पर आदर आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये मागे पडता कामा नयेत. विचारांमधील विविधता ही संघर्षाचे कारण न बनता ज्ञानवृद्धी आणि सामाजिक प्रगतीचे साधन ठरली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीवरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाच्या आधारे केली पाहिजे. सहिष्णुता ही शांततेची पूर्वअट, लोकशाहीची शक्ती आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या निमित्ताने विविधतेचा आदर, मतभिन्नतेचा स्वीकार, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुतेतूनच विश्वास निर्माण होतो, विश्वासातून बंधुभाव वाढतो आणि बंधुभावातून शांततापूर्ण, समताधिष्ठित व मानवतावादी समाजाची निर्मिती होते. विविधतेचा आदर, विचारांचा स्वीकार आणि माणुसकीचा सन्मान हाच सहिष्णु समाजाचा खरा पाया आहे.

***डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)*
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

बाळासाहेब ठाकरे : काळाच्या पडद्यावर उमटलेले वादळी व्यक्तिमत्त्व!

काही माणसे काळाच्या ओघात विस्मृतीत जातात, काही माणसे मात्र काळालाच आपली दखल घ्यायला भाग पाडतात. त्यांच्या विचारांशी सहमत असणारे आणि असहमत असणारे असे दोन्ही वर्ग असतात, परंतु त्यांच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करणे कोणालाही शक्य नसते. शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे अशाच वादळी व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांच्या आवाजात आक्रमकता होती, शब्दांत धार होती, भूमिकेत ठामपणा होता आणि राजकारणात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची विलक्षण क्षमता होती. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे स्मरण करताना केवळ एका राजकीय नेत्याला अभिवादन करणे नव्हे, तर महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासातील एका महत्त्वपूर्ण पर्वाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. प्रख्यात व्यंगचित्रकार प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचे ते सुपुत्र. सुरुवातीला व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. 'फ्री प्रेस जर्नल'मधील त्यांचे व्यंगचित्र हे केवळ विनोदाचे साधन नव्हते, तर सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर भाष्य करणारे प्रभावी माध्यम होते. पुढे १९६० मध्ये 'मार्मिक' या साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या व्यंगचित्रांनी सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारले, व्यवस्थेतील विसंगती उघड केल्या आणि सामान्य माणसाच्या मनातील असंतोषाला अभिव्यक्ती दिली.

१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाली. मुंबईसह महाराष्ट्रातील मराठी तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न, स्थानिकांच्या हक्कांचा मुद्दा आणि मराठी अस्मितेची जपणूक हे शिवसेनेच्या सुरुवातीच्या राजकारणाचे प्रमुख आधार होते. त्या काळात मुंबईच्या औद्योगिक आणि प्रशासकीय क्षेत्रात मराठी तरुणांना संधी मिळावी, त्यांच्या प्रश्नांना राजकीय व्यासपीठ मिळावे, अशी भावना मोठ्या प्रमाणावर व्यक्त होत होती. बाळासाहेबांनी या भावनेला संघटनात्मक स्वरूप दिले. शाखा ही शिवसेनेची केवळ राजकीय कार्यालये नव्हती, तर अनेक ठिकाणी स्थानिक प्रश्नांसाठी लोकांनी धाव घेण्याचे केंद्र बनली. त्यांच्या नेतृत्वाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य कार्यकर्त्याशी थेट संवाद साधण्याची हातोटी. मोठ्या व्यासपीठावरून बोलताना ते श्रोत्यांना खिळवून ठेवत. त्यांच्या भाषणांमध्ये विनोद, उपरोध, आक्रमकता आणि राजकीय भाष्य यांचे विलक्षण मिश्रण असे. त्यांची भाषा नेहमीच संयत किंवा सर्वमान्य होती असे नाही, अनेकदा त्यांच्या वक्तव्यांवरून तीव्र वादही निर्माण झाले. तरीही त्यांच्या शब्दांचा राजकीय परिणाम दुर्लक्षित करता येत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला जनाधार आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केलेली निष्ठा ही त्यांच्या नेतृत्वशैलीची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये होती.

बाळासाहेब ठाकरे यांचे राजकारण केवळ मराठी अस्मितेपुरते मर्यादित राहिले नाही. पुढे हिंदुत्व हा त्यांच्या राजकीय विचारांचा प्रमुख आधार बनला. १९९० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना-भाजप युतीने महत्त्वाचे स्थान म

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पाच गोवंशासह एक क्विंटल मास पोलिसांनी छापा टाकून पकडले

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी**कत्तलीसाठी एका घरात पाच गोवंश दाबून ठेवल्याची माहिती डायरेक्ट 112 क्रमांक मिळाल्याने गंगाखेड पोलिसांनी शनिवार 14 नंबर शनिवार रोजी रात्री उशिराने शहरातील रोशन मोहल्ला भागात छापा मारून पाच गोवंशासन एक क्विंटल मास प्लीस व अन्य साहित्य असा एकूण दोन लाख 75 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत एका जनाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे याबाबत पोलीस अधिक माहिती अशी की सूत्राकडून दिलेल्या माहितीनुसार समजलेले अधिक माहिती अशी की रोशन मोहल्ला परिसरात एका घरात कत्तलीसाठी काही गोवंश दाबून ठेवल्याची माहिती एका व्यक्तीने डायल क्रमांक 112 या क्रमांकावर गुप्तरित्या दिल्याने गंगाखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यकपोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्यासह पोलिस हवलदार मारुती माहोरे पोलीस हवालदार सत्यभान पवार डीबी पथकाचे पोलीस शिपाई परसराम परचेवाड पोलीस शिपाई विठ्ठल हे हेडेपोलीस शिपाई संतोष हंगरगे पोलीस शिपाई गोविंद कदम आदिच्या पथकाने शनिवारी 14 नोव्हेंबर शनिवार रोजीच्या रात्री दहा वाजून 15 मिनिटांनी सुमारास दोन पंचांना सोबत घेऊन रोशन मोहल्ला येथील मज्जित मुस्तफा कुरेशी यांच्या घरी छापा मारला असता त्यांच्या घरात बांधलेल्या अवस्थेत पाच गोवंश अंदाजे किंमत दोन लाख रुपये व एक क्विंटल मास व कत्तलीसाठी वापरल्या जाणारे साहित्य प्लीज वजन काटा माफी इत्यादी साहित्य असा एकूण दोन लाख 75 हजार रुपयांचा मुद्देमाल जागेवर मिळून आला व पंचायत समक्ष हा मुद्देमाल जप्त करून डीबी पथकाचे पोलीस शिपाई परशुराम परचेवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक 15 नोव्हेंबर रोजी पहाटे मज्जित मुस्तफा कुरेशी यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहूल लोखंडे पोलीस शिपाई गोविंद सोनवणे हे करत आहेत

परभणीत16 नोव्हेंबरला शिवानी दीदीचे, खुशियों का पासवर्ड, प्रवचन सुसंवाद कार्यक्रम

हिंदूप्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**धावपळीच्या युगामध्ये प्रत्येक जण समाधानाच्या अपेक्षा करत असताना आनंदी जीवन आणि सकारात्मक विचार आणि मनशांतीचा संदेश देणारा ब्रह्मकुमारी शिवानी दीदीचा यांचा खुश यों का हा विशेष प्रवचन सुसंवाद कार्यक्रम दिनांक 16 नोव्हेंबर सोमवार रोजी परभणी आयोजित करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे मधील अश्वमेध ग्राउंड विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातसायंकाळी साडेपाच ते रात्री आठवेळेत हा कार्यक्रम होणार असून आंतरराष्ट्रीय प्रवक्त्या शिवानी दीदी यांच्या सुश्राव्य वाणीतून जीवनासाठी सकारात्मक विचार मनशांती आणि योग्य जीवनदृष्टी याविषयी सखोल अशी मार्गदर्शन करणार आहेत या कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी साडेपाच ते सहा या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमात होईल नंतर सहा ते आठ या वेळेत शिवानी दीदीचे मुख्य प्रवचन होणार असून ब्रह्मकुमारीज.शिवराम नगर परभणी च्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून पूर्व नोंदणी आवश्यक आहे इच्छुकांनी संकेतस्थळावर नोंदणी करावी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे

विकास योजनांचा लाभ आदिवासींना घरपोच द्यावा-संजय शिरसाट



छत्रपती संभाजीनगर, दि.१५(जिमाका)- शासनामार्फत आदिवासी समाजाच्या विकासासाठी अनेक योजना राबविल्या जातात. मात्र दुर्गम भागात वास्तव्य आणि कमी जागृती असलेल्या समाजापर्यंत योजनांचा लाभ आता आदिवासी विकास विभागाने घरपोच द्यावा,असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज केले.

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम जनजातीय गौरव दिन समारंभाचे आयोजन बीड बायपास येथील अंबिका लॉन्स येथे करण्यात आले होते.

पालकमंत्री संजय शिरसाट, विधान परिषदेचे आमदार सुहास शिरसाट, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, आदिवासी विकास विभागाच्या अमरावती विभागीय प्रादेशिक उपायुक्त शशिकला अहिरराव, प्रकल्प अधिकारी चेतना मोरे, सहा. प्रकल्प अधिकारी बाणेश्वर भगत, डॉ. उद्धव वायाळ, एकलव्य संघटनेचे अध्यक्ष पवन सोनवणे, दीपक पवार आदिवासी संशोधक कडुदास कांबळे, कलावंत विद्यार्थिनी भारती गांगुर्डे आदी या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रारंभी पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते आदिवासी नायकांचे प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, आदिवासी समाज हा तुलनेने कमी शिक्षित आहे. तो दुर्गम भागात राहतो. त्यामुळे त्यांच्या विकासासाठी शासनाने केलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने आता स्वतःहून आदिवासींच्या घरापर्यंत जाऊन योजनांचा लाभ दिला पाहिजे. क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांचे साहस आणि धैर्य याचा सगळ्यांनी अभिमान बाळगला पाहिजे. आदिवासी समाजाचा मुंबई येथे येत्या फेब्रुवारी महिन्यात मेळावा घेण्यात येईल,असेही त्यांनी सांगितले. आदिवासी समाजातील मुला-मुलींनी शिक्षणाचा ध्यास घेऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊन प्रगती साधावी. सर्वच क्षेत्र त्यांच्यासाठी खुले आहेत,असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमातून आदिवासींच्या संस्कृतीचे सादरीकरण करण्यात आले. पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांचे रुप साकारलेल्या नवसुख कोळसे व कलावंत विद्यार्थिनी भारती गांगुर्डे यांच्या सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास विविध आदिवासी संघटनांचे प्रतिनिधी, आदिवासी समाजातील महिला-पुरुष उपस्थित होते.

या सप्ताहात दि.१६ रोजी शिरुर कासार येथे आधार कार्ड व इतर आवश्यक शासकीय कागदपत्रांचे सेवा शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

दि.१७ सिल्लोड येथे लोकप्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत भव्य मेळावा, आरोग्य तपासणी व पोषण जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मंत्री, खासदार, आमदार तसेच जिल्हाधिकारी जालना, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार उपस्थित राहतील.

दि.१८ रोजी प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जनजागृती सप्ताहाचा अधिकृत समारोप होईल.

हिंगोली नांदेड रेल्वे दुहेरीकरण करावे; खा. वडकुते यांची रेल्वे अधिकाऱ्यांच्या बैठकीत मागणी

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**दक्षिण मध्य रेल्वे विभागातील हिंगोली ते नांदेड रेल्वे दुहेरीकरण प्राधान्याने करावे तसेच मराठवाड्यातील रेल्वे सेवा अधिक सक्षम सुरळीत आणि प्रवास स्नेही सुखकर व सर्व सोयी युक्त करावा अशी मागणी खासदार रामराव वडकुते यांनी नांदेड येथे दक्षिण मध्य रेल्वेच्या बैठकीत केली.

या बैठकीस रेल्वे संघर्ष समितीचे गोवर्धन वीरकुंवरअण्णा शेख खलील बेलदार. प्रफुल जैन. प्रकाश नाईक. पंढरीनाथ ढाले. संजय कावडे आदीची उपस्थिती होती. या बैठकीत खासदार वडकुते यांनी अकोला पूर्णा पॅसेंजर रेल्वेचा नांदेड पर्यंत विस्तार करावा इंटरसिटी एक्सप्रेसला बोल्डा रेल्वे स्थानकावर थांबा द्यावा पूर्णा व हिंगोली येथे रेल्वेच्या मोकळ्या पी.पी.पी तत्त्वावर विकास करावा अशा विविध मागण्या केल्या.

सावळदबारा येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



सावळदबारा प्रतिनिधी : भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, ईसा तडवी, जाफर तडवी, शेरखा तडवी, सरवर तडवी, अफसर तडवी, अब्दुल्ला तडवी, सांडू बिस्मिल्ला तडवी, फिरोज तडवी, बिस्मिल्ला तडवी, सुपडा तडवी, गफार तडवी, फिरोज तडवी, प्रेमसिंग राठोड, ममराज राठोड, सुधाकर साळुंके,जावेद तडवी, आदी उपस्थित होते.

उड्डाणपुलाच्या कामामुळे राष्ट्रीय महामार्गावर तीन तास वाहतूक कोंडी

पाणपोईजवळ वाहनांच्या लांबच लांब रांगा; पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर वाहतूक सुरळीत



कन्नड : दि.१५ - ऐन सणासुदीच्या काळात सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाणपोईजवळ सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे रविवारी (दि. १५ नोव्हेंबर) रोजी दुपारी तब्बल तीन तास वाहतूक कोंडी झाली. यामुळे वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

पाणपोईजवळ कन्नड शहराच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील टी-पॉइंट परिसरात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या ठिकाणी कन्नडकडे जाणारी तसेच धुळे आणि छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणारी वाहने एकाच ठिकाणी येत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. त्यातच या ठिकाणी असलेल्या अरुंद सर्व्हिस रोडमुळे वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे.

दरम्यान, बारामती ॲग्रो कारखान्याकडे ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या, ट्रॅक्टर आणि ट्रकचीही याच मार्गावरून मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. रविवारी सुट्टी असल्याने तसेच सोमवारी कामकाज आणि शाळा सुरू होणार असल्याने वाहनांची वर्दळ वाढली होती. परिणामी, महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि प्रवाशांना तीन तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

या वाहतूक कोंडीबाबत डायल ११२ वर कॉल प्राप्त झाल्यानंतर पोलिस अंमलदार विनोद लोंढे आणि नामदेव धोंडकर यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाची 16 नोव्हेंबर रोजी आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: समस्याग्रस्त व पीडित महिलांना आपल्या अडचणी, तक्रारी मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करून त्यांना न्याय मिळवून देणे तसेच आवश्यक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महिला लोकशाही दिन सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी, तर तालुकास्तरावर चौथ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, तर तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष तहसीलदार असतात. जिल्ह्यातील महिलांनी आपल्या वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी विहित नमुन्यात सादर करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परभणी यांनी केले आहे.

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी



हिंगोली : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त हिंगोली येथील बिरसा मुंडा चौकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

या कार्यक्रमास मा. आमदार संतोष टारफे, शिवसेना गटनेते श्रीराम बागर, हिंगोलीचे मा. नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते यांच्यासह आदिवासी समाजातील बांधव व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा सदैव प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजाने एकता, शिक्षण आणि प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाला आदिवासी समाज बांधवांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

धानोरा काळे येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण व जमीन आरोग्य पत्रिका वाटप कार्यक्रम संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**वसंतराव वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी धानोरा काळे, ता. पूर्णा, जि. परभणी येथे जमीन आरोग्य पत्रिका वाटप व शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात परिसरातील सुमारे १०० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये मोसंबी व चिकू बागायतदारांसह हरभरा, हळद आणि तूर उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश होता.

या प्रशिक्षण कार्यक्रमात मृद विज्ञान विभागाचे विभागप्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर यांनी शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी करून शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी जैविक खते व इतर कृषि निविष्ठांचा योग्य वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी आणि संतुलित पीक पोषण साध्य करण्यासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे महत्त्व विविध उदाहरणांसह विशद केले. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन हे जमिनीचे आरोग्य सुधारण्याबरोबरच पीक उत्पादकता वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मोसंबी व संत्रा बागायतदारांना भेडसावणाऱ्या जमिनीचे आरोग्य आणि पीक पोषणविषयक विविध समस्यांवरही त्यांनी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

तसेच हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची मर्यादित उपलब्धता यांमुळे पीक उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर, नियमित माती परीक्षण, जैविक खतांचा वापर आणि जमिनीचे आरोग्य संवर्धन याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक असल्याचे डॉ. कौसडीकर यांनी प्रतिपादन केले.

प्रशिक्षणादरम्यान निंबोळी पेंड, करंज पेंड, शेणखत, गांडूळ खत आदी सेंद्रिय खतांचे महत्त्व व त्यांचा वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विद्यापीठाद्वारे उत्पादित जैविक खतांचा वापर कोणत्या पद्धतीने व किती प्रमाणात करावा, याबाबत प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. यावेळी विद्यापीठामार्फत उपलब्ध असलेल्या विविध सेवा व कृषि निविष्ठांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी कृषि विद्यापीठाच्या संपर्कात राहून आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. कौसडीकर यांनी केले.

मृद विज्ञान विभागातील दीर्घकालीन खतप्रयोग योजनेचे प्रमुख डॉ. रामप्रसाद खंदारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना राष्ट्रीय कृषि विकास योजनेची माहिती दिली. तसेच जमीन आरोग्य पत्रिकेचा अभ्यास करून त्यानुसार पिकांना आवश्यक अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. रासायनिक खतांच्या असंतुलित वापरामुळे जमिनीच्या आरोग्यावर होणारे परिणाम आणि त्याचा पीक उत्पादकतेवर होणारा परिणाम याविषयीही त्यांनी माहिती दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमात श्री. पांडुरंग राजाभाऊ काळे, श्री. योगेश नामदेवराव काळे, श्री. ज्ञानोबा भाऊराव काळे, श्री. उत्तमराव मारोतराव काळे, श्री. संतोष भगवान रेंगे, श्री. उद्धव पंडितराव काळे, श्री. संभाजी पांडुरंग काळे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त अभिवादन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सिम्पोजियम सभागृहात सकाळी ११ वाजता अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या हस्ते क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठातील विविध अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) श्री. पद्माकर पाटील यांनी क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचा, सामाजिक संघर्षाचा तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा संक्षिप्त परिचय करून दिला. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाचे स्मरण करून त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते.

दीपोत्सव आनंदाचा आधाराचा आणि माणुसकीचा; सेवासदन परिवाराचा संवेदनशील उपक्रम



हिंगोली- ही दिवाळी बळीराजाच्या घरी हा उपक्रम राबवण्याचा संकल्प सेवासदन परिवाराने घेतला आणि 100 आत्महत्याग्रस्त कुटुंब व निराधार कुटुंब तसेच दिव्यांग कुटुंबात सेवासदन परिवाराच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमासाठी समाजातील अनेक संवेदनशील व्यक्तीनी मदत केली. लोकसहभागातून हा उपक्रम राबवण्यात आला.

दुष्काळजन्य परिस्थिती आणि हिंगोली जिल्ह्यातील वाढते आत्महत्याचे प्रमाण या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये किराणा किट व साडी चोळी असे मदतीचे स्वरूप होते. तेल कॅन, हरभरा डाळ, साखर फरसाण ,मुरमुरे, शेंगदाणे ,रवा, मसाले ,चटणी, साबण , उटणे ,रांगोळी, पणत्या, आणि साडी चोळी असे हे स्वरूप होते.

या दिवाळी साजरी करू शकलो याचे मनस्वी समाधान आहे असे मत धनराज कदम यांनी व्यक्त केले.

या सर्व संकटामध्ये मनाने खचून जाऊ नका आम्ही तुमच्या सोबत आहोत .. स्वतःची काळजी घ्या तुमची मुले शिक्षणासाठी सेवासदनमध्ये ठेवा असे सांगत मीराताई कदम यांनी या कुटुंबांना धीर दिला. अशा कठीण परिस्थितीमध्ये आमच्या कुटुंबाला तुम्ही आधार दिला असे म्हणत सर्व निराधार महिला भगिनी भावूक झाल्या.

या शंभर कुटुंबांपर्यंत केवळ दिवाळी पोहोचवणे हा उद्देश नव्हताच या कुटुंबाला आधार देणे... त्यांना आम्ही तुमच्यासोबत आहोत असा विश्वास देणे.. त्यांच्या वेदनेच्या काळात त्यांच्या वेदनेवर थोडीशी फुंकर घालणे हा या पाठीमागचा उद्देश होता! आणि सेवासदन परिवारासोबतच खरी संवेदनशीलता जपली ती सर्व दानशूर व्यक्तींनी..!!

या कार्यक्रमाचे अतिशय संवेदनशीलतेने सूत्रसंचालन करणारे विशालभैय्या मुळे, यांनी केले अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत धावपळ करत हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगनभैय्या टेकाळे, शिवाजीभाऊ कऱ्हाळे, संजय मुसळे, पांडुरंग वैद्य, ज्ञानबा मुसळे , सुनील उगले, ज्ञानेश्वर सावंत ,वैभव देशमुख , प्रवीण महाजन , लक्ष्मण तांबिले, अश्विनी जाधव अंजली माने, गोपाल सातपुते,शारदा दोडके , गणेश तांबिले, रवी चौधरी , सेवासदनमधील सर्व चिमुकले आदींनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली ती ज्येष्ठ अभिनेत्री पुष्पाताई चौधरी , कायझेन अकॅडमीचे सर्वेसर्वा महेश डाळिंबकर , नगराध्यक्ष रेखाताई बांगर, राजामतीताई मुटकुळे, इंदुआई देशमुख, आतिशभैय्या दांडेगावकर, ओमप्रकाश देवडा को-ऑपरेटिव्ह बँकेचे सर्वेसर्वा सुनीलजी देवडा सर, प्रकाशजी सोनी सर ,पीआय प्रेमलता गोमासे , सीमाताई मुसळे , पृथ्वीराजभैय्या मुसळे, डॉ, आखिल अग्रवाल, डॉ.रोडगे सर,डॉ. गीते सर, डॉक्टर श्याम जाधव सर, सुरेश येस्के सर, शुभम भैय्या मुंदडा, संजय मुसळे सर, जनार्दन वाघमारे, बापूराव घोंगडे सर, तानाजीभाऊ वैद्य, चंद्रशेखर काळबांडे ,माधव भवर , गजानन जाधव , तसेच सर्व क्षेत्रातील मान्यवर ,सर्व पत्रकार बांधव,आदींची!

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व दानशूर व्यक्तींचे आभार धनराज कदम आणि मीरा कदम यांनी मानले. आज तुम्ही जे दान केले आहे ते अतिशय मोलाचे आहे आणि निसर्ग तुम्हाला हजारो पटींनी वापस देईल असे मीरा कदम म्हणाल्या.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर आदिवासी बांधवांच्या आनंदात सहभागी



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी **तालुक्यातील मांडवा येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आणि जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह निमित्य शनिवारी (दि.१४) आयोजित दीपोत्सवात पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर सहभागी झाल्या. आदिवासी बांधवांसोबत दीपोत्सव साजरा करत त्यांनी त्यांच्या आनंदात सहभाग नोंदविला. यावेळी आदिवासी समाजाच्या संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी तरुण डॉक्टर आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या शिक्षणाविषयी, अनुभवांविषयी तसेच भविष्यातील वाटचालीविषयी माहिती जाणून घेतली. याशिवाय गावातील महिलांशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांच्या समस्या आणि अपेक्षा समजून घेतल्या. शिक्षण, आरोग्य आणि स्थानिक विकासाच्या विषयांवर नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर त्यांनी भर दिला.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा जनजातीय गौरव दिन हा आदिवासी समाजाच्या संघर्षाचा, योगदानाचा आणि सांस्कृतिक वारशाचा सन्मान करणारा दिवस आहे. मांडवा येथील दीपोत्सवातून या गौरवशाली परंपरेचे दर्शन घडले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

11 वर्षांपासून बंद असलेला नॅशनल हेवी इंजिनिअरिंग कारखाना पुन्हा सुरु होणार; केंद्राकडून 1,500 कोटींची मदत

पुणे : तब्बल 11 वर्षांपासून बंद असलेल्या नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेडच्या कारखान्याला पुन्हा उभारी मिळणार आहे. या कारखान्याच्या पुनर्निर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून 1,500 कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे हजारो रोजगारांच्या संधी निर्माण होण्यासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. याच कार्यक्रमात चालकांना थेट मालकी हक्क देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'भारत टॅक्सी' या सहकारी सेवेचा पुण्यात शुभारंभ करण्यात आला. अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याचे काम सुरू असल्याचे शिंदे म्हणाले.

110 एकर क्षेत्रात औद्योगिक पुनरुज्जीवनाचा प्रकल्प

नॅशनल हेवी इंजिनिअरिंगचा पुनर्निर्माण प्रकल्प सुमारे 110 एकर क्षेत्रात उभारण्यात येणार आहे. साखर उद्योग, डेअरी, इथेनॉल, बायोगॅस आणि जैवाधारित उद्योगांसाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री येथे तयार केली जाणार आहे. या प्रकल्पाला राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचीही साथ मिळणार आहे. हा प्रकल्प केवळ बंद पडलेल्या कारखान्याचे पुनरुज्जीवन नसून आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत 2047 या संकल्पनांना बळ देणारा ठरेल. स्वदेशी उत्पादन, कुशल मनुष्यबळ आणि ग्रामीण उद्योगांना यामुळे मोठी चालना मिळेल, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

अमित शाह यांनी दिलेला शब्द पाळला

कोल्हापूरमध्ये दिलेला शब्द पाळत अमित शाह यांनी या प्रकल्पासाठी 1,500 कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून



दिल्याचे शिंदे यांनी नमूद केले. सहकार क्षेत्रातील मक्तेदारी आणि अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत योजनांचे लाभ पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचेही ते म्हणाले. साखर उद्योगाच्या अडचणी सोडवताना 10 हजार कोटी रुपयांच्या प्राप्तिकरासंदर्भातील प्रश्न मार्गी लावून कारखान्यांना दिलासा देण्यात आल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावेळी त्यांनी दिवंगत अजित पवार यांचीही आठवण काढली.

'भारत टॅक्सी'मुळे चालकच बनणार मालक

पुण्यात सुरू झालेल्या 'भारत टॅक्सी' या सहकारी उपक्रमामुळे चालकांना स्वतःच्या व्यवसायाचे मालक होण्याची संधी मिळणार आहे. मध्यस्थ आणि कमिशनची व्यवस्था टाळून चालकांच्या कष्टाचा मोबदला थेट त्यांना मिळावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'सारथी दीदी'सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून महिलांनाही टॅक्सी व्यवसायात संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होईल, असे शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्राला केंद्राकडून मिळालेल्या निधीचा उल्लेख

यूपीए सरकारच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला सुमारे 2 लाख कोटी रुपये, तर एनडीए सरकारच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात 15 लाख कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. राज्याच्या विकासासाठी केंद्राकडे ठामपणे मागणी केली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक ग्रोथ इंजिन असून उद्योग, स्टार्टअप आणि गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्य आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. विकासकामांवर टीका करणाऱ्यांना टोला लगावत चांगल्या कामाचे स्वागत करण्याची वृत्ती असली पाहिजे, असेही ते म्हणाले.

सहकार क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माधुरी मिसाळ यांच्यासह अनेक खासदार, आमदार आणि मान्यवर उपस्थित होते. या प्रकल्पामुळे औद्योगिक विकास, रोजगारनिर्मिती, सहकार क्षेत्र आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

अवघडराव सावंगी येथे महाराजांचा मृतदेह आढळला गळफास घेतलेल्या अवस्थेत

जालना : जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात असलेल्या अवघडराव सावंगी येथे एका महाराजांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आदल्या दिवशी रात्री गावात कीर्तन करून आपल्या मठात परतलेले 41 वर्षीय ह.भ.प. दौलत रामनाथ सातपुते महाराज दुसऱ्या दिवशी सकाळी मृतावस्थेत आढळले.

त्यातच घटनास्थळावरून महाराजांचा मोबाईल फोन गायब असल्याची बाब समोर आल्यानं या घटनेचं गूढ अधिकच वाढलं आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून तपासातून नेमकं सत्य समोर येण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,ह.भ.प. दौलत रामनाथ सातपुते महाराज (वय 41, मूळ रा. मुसळगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक) हे मागील 8 ते 10 वर्षांपासून भोकरदन तालुक्यातील अवघडराव सावंगी येथील पाताळेश्वर मंदिर परिसरातील मठात वास्तव्यास होते. या ठिकाणाहून ते धार्मिक कीर्तन आणि समाजप्रबोधनाचे कार्य करीत होते. गावोगावी जाऊन कीर्तनाच्या माध्यमातून तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे, आई-वडिलांची सेवा करावी, तसेच राष्ट्रसेवेला प्राधान्य द्यावे, असा मोलाचा संदेश ते देत असत. त्यांच्या धार्मिक आणि सामाजिक कार्यामुळे परिसरात त्यांची ओळख निर्माण झाली होती.

काल शनिवारी रोजी रात्री सुमारे 10 वाजेपर्यंत अवघडराव सावंगी येथे त्यांचे कीर्तन झाले. कीर्तन संपल्यानंतर ते नेहमीप्रमाणे आपल्या मठात परतले आणि खोलीत झोपले. मात्र, आज रविवारी रोजी सकाळी बराच वेळ होऊनही महाराज बाहेर न आल्यानं मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या गावकऱ्यांना संशय आला. गावकऱ्यांनी त्यांचा इतरत्र शोध घेतला. मात्र, ते कुठेही आढळून आले नाहीत. अखेर त्यांच्या राहत्या खोलीत पाहणी केली असता भगव्या रंगाच्या रुमालाच्या साहाय्यानं गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला. ही घटना सकाळी सुमारे 10 वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.



घटनेची माहिती मिळताच पारध पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आलं. पथकाने घटनास्थळाची बारकाईने तपासणी करून आवश्यक पुरावे गोळा केले. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक लक्ष वेधणारी बाब म्हणजे महाराजांचा मोबाईल फोन घटनास्थळावर आढळून आलेला नाही. कीर्तन करून मठात परतल्यानंतर सकाळी त्यांचा मृतदेह आढळणं आणि त्यांचा मोबाईल गायब असणं, यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मोबाईल नेमका कुठे गेला? तो हरवला की अन्य काही कारण आहे? या सर्व बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. मृतदेह वालसावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवाल आणि पोलीस तपासानंतर मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

पोलीस तपासाकडे जिल्ह्याचं लक्ष

धार्मिक कीर्तनातून समाजप्रबोधन करणाऱ्या महाराजांच्या अशा आकस्मिक मृत्यूनं अवघडराव सावंगी गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेची नोंद पारध पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ पुढील तपास करीत आहेत. महाराजांच्या मृत्यूमागील नेमकं कारण काय? मोबाईल गायब होण्यामागे काय रहस्य आहे? आणि या घटनेशी संबंधित इतर काही बाबी समोर येतात का? याकडे आता संपूर्ण जालना जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे. या सर्व बाबी आता पोलीस तपासात समोर येणार आहेत.

राज्यातील प्रत्येक खेड्यापाड्यातील दारात आता आरोग्यसेवा

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'हॉस्पिटल ऑन व्हील्स'चे उद्घाटन

मुंबई: गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासीबहुल भागातील नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. आता डोंगराळ आणि वाडी-वस्त्यांवर राहणाऱ्या आदिवासी बांधवांना उपचारासाठी मैलोनमैल लांब प्रवास करण्याची गरज उरलेली नाही. कारण, थेट त्यांच्या गावातच आधुनिक आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज बहुप्रतिक्षित 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' (फिरते रुग्णालय) प्रकल्पाचे शानदार उद्घाटन करण्यात आले आहे.

भौगोलिक अडचणी आणि विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत दळणवळण ठप्प झाल्यामुळे अनेक गावांमध्ये आरोग्य सुविधा पोहोचवणे अत्यंत कठीण जात होते. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अनेकदा नागरिकांचे प्राण धोक्यात येत असत. हीच गंभीर समस्या ओळखून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत हा क्रांतिकारी प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात आला आहे. यासाठी तब्बल 4 कोटी 99 लाख रुपयांचा मोठा निधी खर्च करून फिरते रुग्णालय सुरू करण्यात आले आहे.

या फिरत्या रुग्णालयामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची फौज असणार आहे. हे रुग्णालय एका निश्चित वेळापत्रकानुसार दुर्गम गावांमध्ये जाऊन नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, आवश्यक वैद्यकीय चाचण्या आणि थेट औषधवाटप करणार आहे. विशेषतः माता व बाल आरोग्य, कुपोषण, हिवताप आणि क्षयरोग (TB) यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करून वेळीच योग्य उपचार देण्यावर या मोहिमेत विशेष भर दिला जाणार आहे. जर एखाद्या रुग्णाची प्रकृती अधिक गंभीर असेल, तर त्याला तातडीने नजीकच्या मोठ्या रुग्णालयात हलवण्यासाठीही यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

फक्त फिरते रुग्णालयच नव्हे, तर दुर्गम भागात 24 तास आपत्कालीन सेवा देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांसह सुसज्ज रुग्णवाहिका सेवेसाठी अतिरिक्त 1 कोटी 63 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अशा प्रकारे या संपूर्ण आरोग्य प्रकल्पासाठी तब्बल 6 कोटी 62 लाख रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे गडचिरोलीच्या खनिज बाधित क्षेत्रातील आरोग्य यंत्रणेचा कायापालट होणार आहे.

गेल्या अनेक दशकांपासून दळणवळणाच्या आणि आरोग्याच्या सुविधांपासून वंचित असलेल्या गडचिरोलीतील आदिवासी बांधवांसाठी हा प्रकल्प खऱ्या अर्थाने वरदान ठरणार असून, उपचारासाठी होणारा खर्च आणि वेळ यामुळे मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे.

CSMT रेल्वे स्थानक पुन्हा एकदा उडवून देण्याची धमकी; पोलिसांकडून कसून शोधमोहीम सुरु

मुंबई : मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) रेल्वे स्थानकावर बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा फोन आल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. शनिवारी सायंकाळी ही धमकी मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने स्थानक परिसरात शोधमोहीम सुरू केली. मात्र, तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक आढळले नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी सुमारे 6:50 वाजता 112 या आपत्कालीन हेल्पलाइनवर फोन आला. 9420112655 या मोबाईल क्रमांकावरून फोन करणाऱ्या व्यक्तीने सीएसएमटी स्थानकावर बॉम्ब ठेवल्याचा दावा केला. या माहितीची गंभीर दखल घेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

श्वान पथक आणि बॉम्ब शोधक पथकाकडून तपासणी

धमकी मिळताच श्वान पथक आणि बॉम्ब शोधक व निकामी पथक (बीडीडीएस) स्थानकावर दाखल झाले. संपूर्ण रेल्वे स्थानक आणि परिसराची तपासणी करण्यात आली. ही शोधमोहीम रात्री सुमारे 9.30 वाजता पूर्ण झाली. मात्र, पोलिसांना कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून स्थानक परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

धमकीचा फोन करणाऱ्याचा शोध सुरू

या धमकीची माहिती रेल्वे पोलिसांनी वरिष्ठ नियंत्रण कक्षाला दिली आहे. फोन करणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी आणि त्याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. संबंधित मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोलिसांकडून पुढील माहिती गोळा केली जात आहे.

दरम्यान, यापूर्वीही मुंबईतील काही महत्त्वाच्या ठिकाणांना धमकीचे ईमेल मिळाले होते. अभिनेता अमिताभ बच्चन यांचा बंगला, मुंबई महापौरांचे कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, महालक्ष्मी रेसकोर्स, काही बँका आणि न्यायालयांना लक्ष्य करून हे ईमेल पाठवण्यात आले होते. त्यानंतर संबंधित ठिकाणी बॉम्ब शोधक पथक आणि श्वान पथकाच्या मदतीने तपासणी करण्यात आली होती. त्या ठिकाणीही कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नव्हती. या धमकीच्या घटनांचा तपास सुरू आहे.

भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी नामसाईत दाखल; 20 नोव्हेंबरपर्यंत भाविकांना दर्शनाची संधी

नामसाई : भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी 14 नोव्हेंबर रोजी अरुणाचल प्रदेशातील नामसाई येथील प्रसिद्ध गोल्डन पॅगोडा येथे दाखल झाल्या आहेत. राज्यातील अस्थी प्रदर्शनाचा हा तिसरा आणि अंतिम टप्पा असून, 20 नोव्हेंबरपर्यंत भाविकांना या पवित्र अस्थींचे दर्शन घेता येणार आहे. राज्यपाल लेफ्टनंट जनरल कैवल्य त्रिविक्रम परनाईक (निवृत्त) यांनी पवित्र अस्थींचे स्वागत करून प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

गोल्डन पॅगोडा येथे पवित्र अस्थींची स्थापना

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या माहितीनुसार, नालुंग हेलिपॅड येथे औपचारिक स्वागत केल्यानंतर भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी गोल्डन पॅगोडा (कोंगमु खाम) येथे आणून स्थापित करण्यात आल्या. यावेळी अरुणाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री चौना मीन, राज्यातील मंत्री,



लोकप्रतिनिधी आणि बौद्ध धर्मगुरू उपस्थित होते. प्रदर्शनाचे उद्घाटन करताना राज्यपाल परनाईक यांनी भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी या त्यांच्या जीवनाचे, ज्ञानप्राप्तीचे आणि शाश्वत शिकवणीचे प्रतीक असल्याचे सांगितले. सध्याच्या संघर्ष, असहिष्णुता आणि हिंसाचाराच्या वातावरणात बुद्धांचा शांतता, करुणा, ज्ञान आणि अहिंसेचा संदेश अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनी ही मूल्ये आपल्या जीवनात अंगीकारून सद्भावना आणि परस्पर आदरावर आधारित समाज निर्माण करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

गोल्डन पॅगोडा येथे दोन विशेष प्रदर्शनांचे उद्घाटन

या प्रदर्शनासोबतच गोल्डन पॅगोडा येथील ध्यान केंद्रात दोन विशेष प्रदर्शनांचेही उद्घाटन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघाच्या वतीने आयोजित 'अनअर्थिंग द सेक्रेड पिपरहवा - द स्टोरी ऑफ द होली बुद्धा रेलिक्स अँड देअर डिस्कव्हरी' या प्रदर्शनात उत्तर प्रदेशातील पिपरहवा येथे झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननातून समोर आलेल्या ऐतिहासिक बाबी मांडण्यात आल्या आहेत. भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थींचे ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व तसेच पिपरहवा रत्नसंग्रहाचा प्रवासही या प्रदर्शनातून उलगडण्यात आला आहे. एका शतकाहून अधिक काळानंतर 2025 मध्ये या रत्नसंग्रहाचे भारतात झालेले पुनरागमन हा प्रदर्शनातील महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'क्रॉसरोड्स ऑफ धम्मा - क्लासिकल लेगेसीज, लिव्हिंग आर्ट अँड अँथ्रोपोलॉजिकल पर्स्पेक्टिव्हज' या दुसऱ्या प्रदर्शनात बौद्ध धर्माची कला, इतिहास आणि सांस्कृतिक वारसा प्रदर्शित करण्यात आला आहे. अरुणाचल प्रदेशात यापूर्वी दोन ठिकाणी भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. पश्चिम कामेंग जिल्ह्यातील बोमडिला येथील थुबचोग गत्सेल लिंग मठात 8 ते 13 नोव्हेंबरदरम्यान सहा दिवसीय प्रदर्शन पार पडले. या काळात 35 हजारांहून अधिक भाविकांनी पवित्र अस्थींचे दर्शन घेतले. त्याआधी 31 ऑक्टोबर ते 7 नोव्हेंबरदरम्यान तवांग मठात आयोजित प्रदर्शनाला 31 हजारांहून अधिक भाविकांनी भेट दिली. अशा प्रकारे तवांग आणि बोमडिला या दोन ठिकाणी मिळून 66 हजारांहून अधिक भाविकांनी भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घेतले.

अरुणाचल प्रदेशात तब्बल 13 वर्षांच्या अंतरानंतर भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. नामसाई येथील गोल्डन पॅगोडामध्ये 14 ते 20 नोव्हेंबरदरम्यान भाविकांना दर्शन घेता येणार आहे. त्यानंतर 21 नोव्हेंबर रोजी या पवित्र अस्थी नवी दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात परत नेण्याचे नियोजन आहे.

गाईच्या गोऱ्हांना बेवारस सोडू नका-शासनाने गोऱ्हांच्या संगोपनाची जबाबदारी घ्यावी : स्वप्निल गाडेकर

राहाता (वार्ताहर) शहर व परिसरात गाईंना गोऱ्हा झाल्यानंतर दूध उत्पादक शेतकरी या गोऱ्हांना गोठ्यात सांभाळण्या ऐवजी त्यांना रस्त्याचे कडेला मोकाट अथवा गोणीमध्ये बांधलेल्या अवस्थेत सोडून देत आहे दूध अथवा चारा न मिळाल्याने हे गोऱ्हे मृत पावत आहे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नवजात जन्मलेल्या गोऱ्हांना त्यांच्या आईपासून दूर करणे व त्यांच्या मृत्यूस अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत ठरणे कायदेशीर दृष्ट्या अयोग्य तसेच आपल्या संस्कृतीला न शोभणारे आहे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या गावांमध्ये शासन स्तरावरून या गोऱ्हांचे संगोपनासाठी आवश्यक त्या उपाययोजना व व्यवस्था करून या पशुधनाचे जीव वाचवावे अशी मागणी राहाता सोसायटीचे माजी चेअरमन स्वप्निल कारभारी गाडेकर यांनी केली आहे

प्रगतशील शेतकरी तथा सोसायटीचे माजी चेअरमन स्वप्निल कारभारी गाडेकर यांनी माध्यमांशी संवाद साधताना याविषयी खंत व्यक्त केली ते म्हणाले की आपल्या गोठ्यात असलेल्या गाईला अर्थात गोमातेला झालेला गोवंश आपण जन्मल्यानंतर काही तासात गोणी मध्ये बांधून अथवा मोकाटपणे दुसऱ्याच्या शेताचे कडेला व रस्त्यात बेवारस सोडून जाणे त्या गोमातेवर व प्राणीमात्रावर अन्याय केल्यासारखेच आहे त्या नवजात गोऱ्हांना त्याच्या आईपासून दूर करणे चुकीचे आहे त्याला गाईचे दूध पाजावे लागेल व डेअरीला दूध कमी जाईल त्याला वाढवून आपला काय फायदा चारा दूध व संगोपन याचा विचार केला तर आपले गणित तोट्यात जाईल या भावनेपोटी अपवाद वगळता अनेक शेतकरी जन्मलेल्या गोऱ्हांना काही वेळातच रस्त्याच्या कडेला सोडून देत आहे ही बाब चुकीची आहे राहाता शहरातील रांजणगाव रस्त्यालगत असलेल्या गाडेकर वस्ती लगत शेतात रस्त्याचे कडेला ही समस्या कायमची झाली आहे सोडलेली अथवा टाकून दिलेली गोऱ्हे मोकाट कुत्र्यांची शिकार बनत असून त्यामध्ये त्यांना जीव गमवावा लागत आहे गाईचे दूध व चारा पाणी न मिळाल्याने या गोऱ्हांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. शेताच्या कडेला घराजवळ येणारी दुर्गंधी येऊ नये म्हणून खड्डा घेऊन अनेकदा पुरण्याची वेळ कुठल्याही प्रकारचा संबंध नसताना शेतकऱ्यांना येत आहे पूर्वी मोकाट जनावरांसाठी शासनाचे कोंडवाडे असायचे आता गोऱ्हांचे संगोपन करण्यासाठी शासनाने उपाययोजना करून या मृत्यूच्या दारी व मोकाटपणे सोडल्या जाणाऱ्या गोऱ्यांना जीवदान द्यावे पशुधन विभागाने यासाठी कठोर व कडक पावले उचलावी जेणेकरून गोवंश अर्थात गोऱ्हे फेकली व मोकाटपणे सोडली जाणार नाहीत या करिता विशेष उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी प्रगतशील शेतकरी तथा सोसायटीचे माजी चेअरमन स्वप्निल गाडेकर यांनी केले आहे

कालवड झाली तर लक्ष्मी आली घरी... गोऱ्हा झाला तर गोठ्याला भार म्हणत बेवारसपणे सोडून द्या रस्त्यावरी.. अशीच परिस्थिती अनुभवायास मिळत आहे.ना शेतीच्या उपयोगी.. आर्थिक फायद्याचा या दृष्टीतून गोऱ्हांकडे पाहिले जात असल्याने गोऱ्हांची अवस्था सध्या ना घर का ना घाट का अशीच काही स्वार्थी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी करून ठेवली असल्याची भावना सुज्ञ नागरिक व्यक्त करत आहे

लोणी चा बाजार... परिसरातील गावे बेजार

बुधवारी लोणी येथे जनावरांचा बाजार भरतो या दिवशी राज्यभरातून मोठ्या संख्येने जनावर लोणीच्या बाजारात विक्रीसाठी येतात या ठिकाणी खरेदी विक्रीतून मोठी उलाढाल होत असते मंगळवार तसेच बुधवार रोजी पिंपरी निर्मळ अस्तगाव कोल्हार केलवड पिंपरी लोकाई आडगाव या परिसरात सुद्धा बेवारस स्थितीतील गोऱ्हे आढळून येतात आठवड्याला ही समस्या उद्भवत असल्याने लोणी चा बाजार आणि परिसर बेजार अशीच अवस्था या ठिकाणी बघायला मिळते

गोवंश रक्षकांनी पुढे येण्याची गरज

गोवंशक रक्षकांनी आजपर्यंत बेकायदा वाहतुकीद्वारे कत्तलखान्यात जाणाऱ्या गोवंशांस मोठ्या संख्येने वाचवले आहे सातत्याने कसायचे दारातून व कत्तलखान्यापासून गोवंशाची सुटका केली जात आहे आता जन्मजात बेवारसपणे सोडून दिल्या जाणाऱ्या गो वंशांचा उपासमारीने अथवा इतर पद्धतीने होणाऱ्या मृत्यूपासून अर्थात मृत्यूच्या दाढेतून वाढविण्याकरिता विशेष पुढाकार घेणे गरजेचे आहे

'चित्रपताका– 2026'च्या दुसऱ्या पर्वाचा दिमाखदार शुभारंभ!

मुंबई: सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'चित्रपताका 2026' या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या पर्वाचा उद्घाटन सोहळा रविवारी, 15 नोव्हेंबरला दिमाखात संपन्न झाला. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. 'बंधू' या सिनेमाचे प्रदर्शनाने रविवारपासून या चार दिवसीय महोत्सवाचा प्रारंभ झाला असून महोत्सवात 33 सिनेमे आणि 15 हून अधिक संवादसत्रांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे.

प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात 15 ते 18 नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव संपन्न होणार असून रविवारी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महोत्सव संचालक पुरुषोत्तम बेर्डे, प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम, उद्घाटकीय सिनेमा असलेल्या 'बंधू' चित्रपटातील कलाकार जितेंद्र जोशी आदी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911